# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**औरंगाबाद जिल्ह्यातील कुटुंब कल्याण व नागरी हिवताप उपचार व निर्मुलन याकरिता असलेल्या कर्माचा-यांचे वेतन देण्याबाबत**

**(१) २८९७० (१२-११-२०१८). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील कुटुंब कल्याण व नागरी हिवताप उपचार व निर्मुलन याकरिता असलेल्या कर्मचा-यांचे वेतन देण्यासाठी ८ कोटी रुपयांचे अनुदान औरंगाबाद महानगरपालिकेला शासनाकडून अद्यापपर्यंत मिळालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनुदान अद्याप उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, योजनेतील कर्मचा-यांचे वेतन थकीत राहू नये व कुटुंब कल्याण व नागरी हिवताप यासाठी लागणारे औषधे व साहित्यांची टंचाई भासू नये म्हणून शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-११-०००२) :** (१) व (२) औरंगाबाद महानगरपालिकेत कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनापोटी रु.४.४५ कोटी इतके सहाय्यक अनुदान तसेच नागरी हिवताप योजनेअंतर्गत रु.७.९१ कोटी इतके अनुदान संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांच्याकडून प्रलंबित आहे, असे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर योजना बंद पडू नये अथवा त्यामध्ये व्यत्यय येऊ नये म्हणून या योजनेमध्ये कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांचे वेतन महानगरपालिका आपल्या नियमित महसूली उत्पन्नातून तात्पुरत्या स्वरुपात अदा करीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रुस्तमजी समुहाच्या रिसायलेन्स रिअल्टी प्रा.लि.ने २.५ इतके चटई क्षेत्र अनुज्ञेय असतांना प्रत्यक्षात ४.१४ इतके चटई क्षेत्र वापरल्याबाबत**

**(२) ६०२९२ (३०-११-०००२). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे पूर्व (मुंबई) येथील गांधीनगरात रुस्तमजी समुहाच्या रिसायलेन्स रिअल्टी प्रा.लि. यांच्या पुनर्विकासात २.५ इतके चटईक्षेत्र अनुज्ञेय असतांना प्रत्यक्षात ४.१४ इतके चटई क्षेत्र विकासकाने वापरले याबाबत राष्ट्रीय हरीत प्राधिकरणाकडे श्री.अनिल थरथरे यांनी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय हरीत प्राधिकरणाने रुस्तमजी आणि ओंकार रिअल्टर्स विरोधात पर्यावरण उल्लंघनाबाबत कारवाई करण्यात यावी असे आदेश शासनास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राधिकरणाच्या आदेशाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (३०-११-०००२) :** (१) म्हाडाकडून प्राप्त अहवालानुसार श्री. अनिल थरथरे यांनी पर्यावरण विभागाने संस्था / विकासक यांना दिलेली मंजुरी व २.५ च.क्षे.नि. च्या वर ४.१४ च.क्षे.नि. पर्यंत बांधकाम क्षेत्रफळाकरीताच्या मंजुरीच्या विरोधात तक्रार केली आहे.

(२) अपील क्र. ९/२०१४ व अपील क्र. १४/२०१४ च्या आदेशान्वये विकासकाने दाखल केलेली मोशन ऑफ ॲडमिशन १०८/२०१४ व १२५/२०१४ खारिज करुन राष्ट्रीय हरित लवादाने दि. ०४.०५.२०१६ रोजी आदेश पारित केले आहेत व तक्रारदार श्री. अनिल थरथरे यांनी केलेली मुळ अपील क्र. ९/२०१४ व अपील क्र. १४/२०१४ पुढील सुनावणीकरीता दाखल करुन घेण्यात आले आहे असे उपाध्यक्ष, म्हाडा यांनी त्यांच्या अहवालान्वये कळविले आहे.

(३) व (४) राष्ट्रीय हरित लवादाकडे याबाबतच्या तक्रारीवर अद्याप सुनावणी प्रलंबित आहे, असे म्हाडाने कळविलेले आहे.

---

**कोल्हापूर शहराच्या सुरक्षेसाठी राबविण्यात आलेल्या सेफ सिटी प्रकल्पात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३) ७१११४ (१७-१-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहराच्या सुरक्षेसाठी राबविण्यात आलेल्या सेफ सिटी प्रकल्पात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची राज्याच्या लोकायुक्त किंवा ईडी सारख्या संस्थाकडून चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत सर्व स्तरावरुन मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-११-२०१८) :** (१), (२) व (३) अशा आशयाच्या बातम्या स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाल्या, हे खरे आहे.
• त्यानुषंगाने कोल्हापूर महानगरपालिकेने सदर प्रकल्पाचे डॉ. डी. वाय. पाटील, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर यांच्या मार्फत तांत्रिक लेखापरिक्षण करुन घेतले आहे. लेखापरिक्षण अहवालानुसार प्रकल्पाचे काम तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
• तसेच प्रकल्पाचे विशेष तांत्रिक परिक्षणाची मागणी कोल्हापूर महानगरपालिकेच्या महासभेत केल्यामुळे डॉ. विठ्ठल बांदल (आय.आय.टी. मुंबई) यांच्यासह दोन सदस्यांच्या समितीमार्फत सदर प्रकल्पाचे विशेष तांत्रिक परिक्षण करुन घेतले आहे. अहवालानुसार प्रकल्पाचे काम निविदा अटी व शर्ती प्रमाणे झाली असल्याचे कोल्हापूर महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ‘सर्वासाठी घरे’ या योजनेसाठी शासनाला अर्थसहाय्यपोटी केंद्र शासनाने उपलब्ध करून दिलेला ३७९ कोटीचा निधी विनावापर पडून असल्याबाबत

**(४) ७५३८१ (२१-०४-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहूल कुल (दौंड), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंतप्रधानाच्या ‘सर्वासाठी घरे’ या योजनेसाठी शासनाला अर्थसहाय्यपोटी केंद्र शासनाने ३७९ कोटी रूपये उपलब्ध करून दिले असले तरीही परवडणाऱ्या घरांची एकही वीट उभी राहू न शकल्याने ही रक्कम पडून आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे डिसेंबर, २०१६ अखेरपर्यंत एकूण १ लाख १० हजार घरांची निर्मिती सुरू व्हावी अशी शासनाची इच्छा असतानाही आजमितीस घरे बांधण्याच्या दृष्टीने कोणतेही काम सुरू झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेंतर्गत केवळ कागदावर १ लाख १० हजार घरांचा आराखडा तयार करण्यात आला असून त्यासाठी मुंबई महानगर प्रदेश परिसरातील कल्याण (५), वसई (२), ठाण्यासह कर्जत, खालापूर तसेच कोकणातील रायगड या ठिकाणी प्रत्येकी १ अशा तऱ्हेने ११ ठिकाणांची निवड करण्यात आली असून त्यापैकी ३३ हजार ५१० घरांसाठी म्हाडाच्या कोकण गृहनिर्माण मंडळाने तिजोरीत खडखडाट असतानाही एकूण ३ हजार ६११ कोटी रुपयांच्या निविदाही जाहिर केल्या होत्या, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदरहू योजनेसाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला ३७९ कोटी रुपयांचा निधी पडून राहण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०३-११-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत केंद्र शासनाने दि.२७.०९.२०१६ रोजी राज्यातील १३ प्रकल्पांसाठी पहिला हप्ता म्हणून वितरीत केलेल्या रु.३७१.५८ कोटी इतक्या निधीपैकी अकोला महानगरपालिकेस रु.७.४४ कोटी, अमरावती महानगरपालिकेस रु.३६.८८ कोटी तसेच कोकण मंडळास रु.१६४.९७६ कोटी इतके अनुदान वितरीत केले आहे. केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने आतापर्यंत राज्यातील २७३ प्रकल्पांतर्गत ६,७१,६२२ (५,४८,१८८ EWS घरकुलांना मान्यता दिली आहे). त्यापैकी ३१,५८९ EWS घरकुलांचे बांधकाम सुरु असून २९६ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

(३) ठाणे जिल्हयातील ७,रायगड जिल्हयातील २ व पालघर जिल्हयातील २ अशा ११ जमिनींवर प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यासाठी दि.२४.१०.२०१६ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि, काही कारणास्तव ठाणे जिल्हयातील ६ जमिनींवर योजनेच्या निविदा नव्याने मागविण्यात आल्या आहेत. सदर योजना अग्रीम अंशदान (Advance Contribution) तत्वावर राबविण्यात येत असून, त्याकरिता म्हाडाच्या निधीतून (Seed Capital) रक्कम उपलब्ध करुन देण्यात येणार आहे व उर्वरीत रक्कम प्रगतीनुसार लाभार्थ्यांकडून वसूल करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातपुर (जि.नाशिक) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये अग्नीशमन केंद्र उभारण्याबाबत**

**(५) ७८१०८ (२०-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपुर (जि.नाशिक) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये अग्नीशमन केंद्राची आवश्यकता असल्याने या ठिकाणी अग्नीशमन केंद्र मंजुर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २ मे, २०१६ रोजी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातपुर औद्योगिक वसाहतीमध्ये अग्नीशमन केंद्र स्थापित करण्याचे शासनाचे विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१८) :** (१) होय
(२) व (३) सातपूर औद्योगिक वसाहतीमधील अग्नीशमन केंद्र औद्योगिक विकास महामंडळाने सन १९७९ मध्ये नाशिक महानगरपालिकेस हस्तांतरीत केले असून सदर केंद्र महानगरपालिकेमार्फत कार्यान्वित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील नगरसेवक, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(६) ८४८०८ (११-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरसेवक, जिल्हापरिषद सदस्य आणि पंचायत समिती सदस्य यांच्या मानधनात वाढ करण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१८) :** (१) व (२) ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक २० नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या आदेशान्वये अध्यक्ष/उपाध्यक्ष जिल्हा परिषद व सभापती/उप सभापती, पंचायत समिती व सभापती विषय समिती यांच्या मासिकमानधनात वाढ करण्यात आली आहे. तसेच ग्राम विकास व जल संधारण विभागाच्या दिनांक १४ मार्च, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य यांच्या प्रवास भत्यात वाढ करण्यात आली आहे.

नगर विकास विभागाच्या दिनांक १५ जुलै, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील महानगरपालिकांच्या सदस्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील महापालिकांच्या जमीनीवर वसलेल्या अनधिकृत झोपडपट्यांवर पात्र झोपडीधारकांना वैयक्तिक स्वरुपात जमीनी देण्याबाबत**

**(७) ८९३०८ (२३-०८-२०१७). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महापालिकांच्या जमीनीवर वसलेल्या अनधिकृत झोपडपट्यांवर पात्र झोपडीधारकांना त्यांच्या धारण क्षेत्रानुसार वैयक्तिक स्वरुपात जमीनी देण्याचा महत्वपूर्ण निर्णय दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी कधीपासून होणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०५-११-२०१८) :** (१) व (२) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारण, निर्मुलन व पुनर्विकास) १९७१ मधील तरतूदीनुसार पात्र झोपडपट्टीधारकांना त्यांच्या भोगवटयाखालील जमिनीचा भाडेपट्टा मिळण्याच्या दृष्टीने शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, दि.१०.७.२००२ मध्ये शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, दि.१६.७.२०१६ व ३.१.२०१७ अन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत. मात्र सदर तरतुदी मुंबई, ठाणे, पुणे व पिंपरी-चिंचवड या शहराना लागू नाहीत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा काळाधोंडा (तेलीपाडा) (ता.उरण, जि.रायगड) येथे अनधिकृत बांधकाम करणा-या आरोपींविरुध्द सिडको दप्तरी पुरावे असल्याबाबत**

**(८) ९३०१० (२३-०८-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा काळाधोंडा (तेलीपाडा) (ता.उरण, जि.रायगड) येथे अनाधिकृत बांधकाम करणा-या आरोपीविरुध्द सिडकोकडे पुरावे असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात आरोपी निर्दोष सुटल्यानंतर अपिल प्रपोजल पाठविण्यास सिडको प्रशासनाने ५९४ दिवस विलंब लावला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात ॲड. शशिकांत पाटील यांनी संबंधित विभागाचे व्यवस्थापकीय संचालक यांना वारंवार अर्ज देऊनही त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर अनाधिकृत बांधकामे करणा-यांवर व या बांधकामांना अभय देणा-या सिडको प्रशासनातील दोषी अधिका-यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१८) :** (१), (२), (३) व (४) मौजे काळाधोंडा (तेलीपाडा), ता.उरण, जि.रागयड येथील श्री.किशोर हरी पाटील यांनी सर्व्हे क्र.२४/१ मध्ये जागेवर

अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्याने सिडकोने दि.२०/३/२००२ रोजी नोटीस देऊन श्री.किशोर हरी पाटील यांच्याविरुध्द उरण पोलिस ठाण्यामध्ये एफआयआर दाखल केला होता. तथापि, या प्रकरणी श्री.पाटील यांना मा.न्यायालयाने दि.१४/२/२००८ रोजी निर्दोष मुक्त केले. सदर निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले फौजदारी अपिल क्र. ४५२/२०१० विलंबाच्या कारणास्तव फेटाळले आहे. सदर अनधिकृत बांधकाम गरजेपोटी केल्याचे नमूद करुन ते नियमीत करण्यासाठी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याने सिडकोस अर्ज केलेला असून त्यावर कार्यवाही सुरु आहे.

तसेच सर्व्हे नं.४४/५ मधील अनधिकृत बांधकामाबाबत श्रीमती मंदा हरी पाटील यांना महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम, १९६६ अंतर्गत दि.२१/७/२०१७ रोजी नोटीस देण्यात आली आहे. त्यावर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याने १२.५% योजनेअंतर्गत या भूखंडावर शिल्लक पात्रता मिळण्याबाबत अर्ज केला असून त्यावर प्रचलित शासन धोरणानुसार सिडकोमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) शहरात संत चोखोबा यांचे स्मारक उभारण्याबाबत**

**(९) ९३७५२ (०४-०९-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि. सोलापूर) शहरात जगभर प्रसिद्ध असलेले श्री विठ्ठल भक्त, थोर, महान संत चोखोबा यांचे जन्मस्थळ आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मंगळवेढा शहरात दलित समाजातील थोर संत आणि श्री विठ्ठलाचे असिम भक्त म्हणून ओळख असणारे संत श्री चोखोबा यांचे अद्यापही स्मारक किंवा स्मृतिस्थळ नसल्याचेही आढळून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री क्षेत्र पंढरपूर येथील श्री. विठ्ठल मंदिरात सूध्दा,अद्यापही या थोर महान संतांचे स्मरण हे मंदिरा बाहेर पायरीवरच होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन या थोर महान जगविख्यात दलित समाजातील संतांचे यथोचित स्मारक किंवा स्मृतिस्थळ स्थापण्याबाबतची जनतेची व वारकरी,समाज यांची मागणीपुर्ण करणेसाठी मंगळवेढा येथे जागा उपलब्ध करून संत चोखोबा यांचे
स्मारक उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-११-२०१८) :** (१) व (२) मंगळवेढा शहरात श्री विठ्ठल भक्त, थोर महान संत चोखोबा यांचे समाधीस्थळ आहे. तेथे त्या परिसरात त्यांचे उचित स्मारक व्हावे, अशी मागणी सन्माननीय लोकप्रतिनिधींनी केली होती.

(३) होय.

(४) याबाबत विश्वस्त अध्यक्ष, श्री संत चोखोबा समाधी ट्रस्ट, मंगळवेढा यांनी मागणी केल्यानुसार सदर समाधीच्या लगतच्या सिटी सर्व्हे नंबर २२९२, २२९३, २२९४, २२९५, २२८२ व २२८३ या शासनाच्या / नगरपरिषदेच्या जागा श्री संत चोखोबांचे भव्य स्मारक, साहित्य, ग्रंथ संग्राहलय व संशोधन केंद्र तसेच बाहेरुन येणारे वारकऱ्यांसाठी भक्त निवास यासाठी देण्यास्तव ना-हरकत दाखला देण्यास विशेष सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १६४५ दिनांक ३१ मार्च, २०१५ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे. त्याप्रमाणे दिनांक २६ मे, २०१५ रोजी नगरपरिषदेने ना-हरकत दाखला दिलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील म्हाडाच्या झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत करण्यात येणाऱ्या कामांबाबत**

**(१०) ९४९५७ (४-९-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील झोपडपट्टी विभागात नवीन शौचालये उभारणे व त्यांची दुरुस्ती करणे अशी विविध कामे आमदार, खासदार निधीतून म्हाडाच्या झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत करण्यात येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निधीतून करण्यात येणारी कामे मंडळाचे अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने होत असून बनावट चाचणी प्रमाणपत्रांमार्फत कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांनी सन २०१२ मध्ये गैरव्यवहार केल्याचे प्रकरण नुकतेच निदर्शनास आले आहे त्यामुळे झोपडपट्टी सुधार मंडळाचा हा निधी बंद करण्यात येणार असल्याचे दिनांक २९ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता (११-१०-२०१८) :** (१) व (२) मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाच्या अहवालानुसार, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत आमदार/खासदार यांनी सुचविलेल्या व जिल्हा नियोजन समितीने मंजूरी दिलेल्या विविध निधीतून कामे करण्यात येतात. तसेच, झोपडपट्टी सुधार मंडळाचा निधी बंद करण्यात येणार असल्याचे दि.२९.०८.२०१७ दरम्यान निदर्शनास आले नाही.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षण अहवालानुसार बनावट चाचणी प्रमाणपत्रांबाबत संबंधित कंत्राटदार तसेच अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याने २० कंत्राटदार, १७ मजुर सहकारी संस्था यांना काळया यादीत टाकण्यात आले आहे. तसेच, प्राधिकरणामार्फत संबंधित अधिकाऱ्यांना नोटीसा बजावण्यात आल्या असून त्याबाबत पुढील कार्यवाही प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ऐरोली क्षेत्रात आंतरराष्ट्रीय दूतावासाच्या कार्यालयासाठी राखून ठेवण्यात आलेल्या जमीनीवर बहूउद्देशीय प्रकल्प राबविण्याबाबत**

**(११) ९५२१९ (०१-०१-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐरोली क्षेत्रात आंतरराष्ट्रीय दूतावासाची कार्यालये सुरु करण्याच्या उद्देशाने सिडकोने सुमारे २७ हेक्टर जमीन राखून ठेवली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोस विविध देशांकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे या जागेवर दुसरा बहूउद्देशीय प्रकल्प राबविण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बहुउद्देशीय प्रकल्पाचे थोडक्यात स्वरूप काय आहे व तो राबविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) :** (१), (२) व (३) ऐरोली क्षेत्रातील सेक्टर १०-ए येथील सुमारे सिडकोच्या ताब्यातील ३५ हेक्टर जमीन आंतरराष्ट्रीय दूतावासांची कार्यालये सुरु करण्याच्या अनुषंगाने राखून ठेवण्यात आली होती.

तथापि, विविध देशांकडून प्रतिसाद न मिळाल्याने सदरहू जमिनीवर असाधारण स्वरुपाचा विकास करुन सिडकोस महसूल प्राप्त व्हावा यासाठी एक प्रतिकात्मक (ICONIC) वास्तू उभारण्याचा बहुउद्देशीय प्रकल्प प्रस्तावित करण्याची बाब सिडकोच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंधेरी (मुंबई) येथील वर्सोवा खाडीमध्ये साचलेला गाळ काढण्याबाबत**

**(१२) ९९८६० (०६-०१-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) येथील वर्सोवा खाडीमध्ये मोठ्या प्रमाणात साचलेला गाळ न काढल्याने तेथील स्थानिक मच्छीमारांच्या बोटींचे अपघात होऊन नुकसान होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गाळामुळे तेथील मच्छीमारांना मच्छीमारी करणे अवघड जात असून मत्सबीज उत्पादनाला धोका निर्माण होऊन मासळी मिळण्याचे प्रमाण अत्यंत कमी झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्सोवा खाडीतील एकुण ५५ लाख क्यूबीक मिटर साचलेला गाळ लवकरात लवकर काढण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजनात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१८) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) वर्सोवा खाडीत एकूण ८,८०,००० घनमीटर गाळ काढणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत वर्सोवा येथील स्थानिक मच्छिमार सोसायटी,लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार वर्सोवा खाडी मुखाजवळ नौकानयन मार्गातील गाळ काढण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून वर्सोवा खाडीचे मुखाजवळ नौकानयन मार्गातील १,२८,५८६ घनमीटर एवढी गाळ उपसणी माहे मार्च २०१८ मध्ये करण्यात आली आहे.

वर्सोवा बंदरातून मोठ्या प्रमाणावर मासेमारी केली जाते. वर्सोवा खाडीत मोठ्या प्रमाणावर साचलेला गाळ काढण्यासाठी रु.३६.८१ कोटीचा प्रस्ताव सागरमाला योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या नौवहन मंत्रालयाकडे, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून दिनांक ३१.०७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये ५० टक्के निधी प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. उर्वरित ५० टक्के निधी प्राप्त करुन घेण्यासाठी मेरीटाईम बोर्डाच्या दिनांक ३१.०७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक मध्य येथील विविध पुलांच्या कामांना अर्थसंकल्पात निधीची तदतूद करण्याबाबत

**(१३) १०४८६२ (१४-०४-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक मध्य येथील विविध पुलांच्या कामांना अर्थसंकल्पात निधी देणे कामी शिफारस मा. वित्त व नियोजन मंत्री यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक १४ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार प्रस्ताव तयार करण्यात येऊन निधी देण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाचे स्वरुप काय आहे व सदर प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी प्रस्ताव सादर करण्याबाबत महानगरपालिकेस निर्देश देण्यात आलेले नसल्याने, त्यांचेमार्फत सदर कामाचे प्रस्ताव सादर करण्यात आले नाहीत व सदर कामांना निधी उपलब्ध करून दिलेला नाही.

प्रस्तावित करण्यात आलेली कामे ही, नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीत व त्यांच्या अंतर्गत रस्त्यावरील आहेत. ही कामे घेण्यासाठी नाशिक महानगरपालिका हे सक्षम प्राधिकरण आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी धारण केलेल्या क्षेत्राचे सर्व्हेक्षण करण्याबाबत

**(१४) १०४९०१ (१२-०४-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, नगरविकास राज्यमंत्री, विधानसभा अध्यक्ष, विधानपरिषद सभापती महोदयांना ग्रामस्थांच्या हितांचा अंतर्भाव असलेली सर्वसमावेशक योजना आणण्याकरिता निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास झालेल्या बैठकीमध्ये प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार त्यांनी धारण केलेल्या क्षेत्राचे सर्व्हेक्षण करण्याची कार्यवाही सुरु करू असे लेखी आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लेखी आदेश देऊनही अद्यापी सर्व्हेक्षण सुरु करण्यात आलेले नाही याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सर्व्हेक्षण करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१८) :**(१) व (२) होय.

(३) व (४) नवी मुंबईतील 'गावठाणे व विस्तारित गावठाणांतील घरे व प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या प्रश्नाबाबत' मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१६.०३.२०१७ रोजी मा. राज्यमंत्री (नगर विकास) व लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने नवी मुंबईमधील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेल्या बांधकामांचे नियमितीकरण करण्यासाठी त्यांनी धारण केलेल्या क्षेत्राचे सर्वेक्षण करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, रायगड यांच्या मदतीने सिडको, नवी मुंबई यांनी सत्वर सुरु करावी असे निदेश शासन पत्र, दि.१६/०३/२०१७ अन्वये सिडकोस देण्यात आले आहेत.

त्यानुषंगाने सिडकोच्या दि.३०.०३.२०१७ रोजी सर्व संबंधितांसमवेत आयोजित केलेल्या बैठकीत सर्व्हेक्षणाकरिता कार्यवाहीबाबत सविस्तर सूचना देण्यात आल्या आणि सर्वेक्षणाची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी पार पाडावी व त्याकरिता सिडकोकडून सर्वतोपरी सहाय्य देण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले. सदर गरजेपोटी केलेल्या घरांच्या सर्वेक्षणामध्ये बांधकामांची सद्य:स्थिती, जागेची मालकीसंदर्भातील कागदपत्रे, गावठाणाच्या सरहद्दीची खात्री करणे, बांधकामाचा दिनांक व सदर बांधकाम विहीत दिनांकापूर्वीचे आहे किंवा कसे इ. बाबींचा समावेश करण्याचेही निर्देश बैठकीमध्ये देण्यात आले असून सर्व्हेक्षणाच्या कामात सुसूत्रता व संनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी सिडकोकडे ठेवण्यात आली आहे. सदर निर्णयास दि.१६.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनाने कार्योत्तर मंजूरी केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**घणसोली ते ऐरोली पामबीच मार्गाचे काम एमएमआरडीए अथवा सिडकोमार्फत करण्याबाबत**

**(१५) १०५३१३ (१२-०४-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईहून मुंबईला लवकर पोहचता यावे तसेच शहरातील वाहतुकीची समस्या दूर व्हावी व दोन्ही शहरातील व्यवसाय वाढावा यासाठी सिडकोने घणसोली ते ऐरोली पामबीच मार्गाचे काम हाती घेतले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गाचे काम सुरु असतांना खारफुटी अडथळा आल्यामुळे सदर मार्गाचे काम बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पामबीच मार्गाचे काम नवी मुंबई महानगरपालिकेने करावे असा निर्णय नुकताच सिडकोने घेतला असल्याने नवी मुंबई महानगरपालिकेवर आर्थिक भार पडल्याने विकास कामावर याचा परिमाण होईल म्हणून सदरच्या पामबीच मार्गाचे काम एमएमआरडीए अथवा सिडकोनेच करावे असे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा. मुख्यमंत्री महोदयांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१८) :** (१), (२), व (३) हे खरे आहे.

(४) • नवी मुंबई महानगरपालिककेतील शहराअंतर्गत वाहतुक सुकर व जलद गतीने होणेसाठी (City Mobility Plan) अंतर्गत १८ प्रकल्प बनविण्याच्या प्रस्तावास माहे जुलै, २०१८ मध्ये महासभेने मंजूरी दिलेली आहे.

• सिडकोने बेलापूर ते ऐरोली या २१.१५ कि.मी. पामबीच मार्गावरील उर्वरित १.९५ कि.मी. लांबीचा घणसोली ते ऐरोली पूल प्रस्तावित केला असून सदरचे काम सिडको व नवी मुंबई यांनी संयुक्तीकरित्या करण्याच्या प्रस्तावास नवी मुंबई महानगरपालिकेच्या महासभेने मंजूरी दिली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईस्थित अंधेरी पूर्वेतील शेर-ए-पंजाब प्लांट, सिध्दिविनायक चाळीच्या शौचालयांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१६) १०५५९५ (१९-०४-२०१८). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील अंधेरी पूर्वेतील शेर-ए-पंजाब प्लांट, सिद्धिविनायक चाळीच्या शौचालयांची दुरवस्था झाल्यामुळे विभागातील १,५०० राहिवाशांचे प्रचंड हाल होत असल्याची बाब दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विभागातील शौचालयांची देखभाल समर्थ डेव्हलोपर्सची असून वारंवार नागरिकांनी दुरुस्तीचे निवेदन मा. मुख्यमंत्री व आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांना माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान पासून वारंवार देवूनही अद्याप दुरुस्ती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित विकासकांवर व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१३-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) सदर शौचालयाची दुरुस्ती विकासकामार्फत केलेली असून शौचालयाची देखभाल विकासक करीत असल्याचा झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

---

**वांद्रे (पूर्व ) मुंबई येथे आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र उभारण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(१७) १०६१०० (०४-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वांद्रे (पूर्व) मुंबई येथे आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र उभारण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे गत १ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार वित्तीय केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१८) :** (१), (२) व (३) विशेष आर्थिक क्षेत्र कायदा-२००५ अंतर्गत स्थापन केलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये (SEZ) या कलम १८(१) अन्वये जागतिक वित्तीय सेवा केंद्राची उभारणी करण्यास मान्यता देण्यात येते. वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये जागतिक वित्तीय सेवा केंद्रांच्या उभारणीच्या अनुषंगाने सदर प्रक्रीयेवर देखरेख व समन्वय याकरिता शासनाने दिनांक ३ डिसेंबर,२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मा.वित्त राज्यमंत्री,

भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली कार्यबलाची (Task Force) स्थापना केली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने जागतिक वित्तीय सेवा केंद्र उभारणीसाठीचा आराखडा (Master Plan) व अर्बन डिझाईन मार्गदर्शक तत्वे तयार करण्यासाठी मे. टाटा कन्संलटींग इंजिनियर्स लि. व मे. टाऊन लॅण्ड कन्संलटंट (हाँगकाँग) यांच्या संयुक्त उपक्रमासोबत दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी करारनामा केला आहे.

प्राधिकरणाने दिनांक ६ जानेवारी,२०१७ रोजीच्या पत्रान्वये विहीत नमुन्यात अर्ज करुन विकास आयुक्त, सीप्झ, विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ), भारत सरकार यांना वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये G-Text Block मध्ये विशेष आर्थिक क्षेत्र मान्य करुन त्यावर जागतिक वित्तीय सेवा केंद्र स्थापन करण्यास मान्यता देण्यास विनंती केली आहे.

विशेष आर्थिक क्षेत्र प्रस्तावांची छाननी करण्याकरिता मा.मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या उच्चाधिकार समितीच्या दिनांक १०.२.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये प्राधिकरणाच्या वांद्रे-कुर्ला संकुलामधील G-Text Block मध्ये विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.

शासनाने दिनांक २२.२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्राधिकरणाच्या वांद्रे-कुर्ला संकुलामधील G-Text Block मध्ये विशेष आर्थिक क्षेत्र प्रस्तावाच्या मंजूरीसाठी संचालक, वाणिज्य विभाग (विशेष आर्थिक क्षेत्र विभाग, वाणिज्य व उद्योग, मंत्रालय) भारत सरकार यांच्याकडे शिफारस केली आहे.

---

## मुंबई शहरामध्ये काचेची आच्छादने असलेल्या इमारतींवर असलेल्या बंदीबाबत

**(१८) १०७३९१ (१९-०४-२०१८). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये काचेची आच्छादने असलेल्या इमारतींमध्ये ५ वर्षापूर्वी महानगरपालिकेने बंदी घातली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोठया प्रमाणात इमारती उभ्या राहत असून सदरहू इमारती काचांची आच्छादने केल्याचे प्रकार मुंबई शहरात वाढले असल्याबाबत माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान सामाजिक व राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आयुक्त, मुंबई महानगरपालिका तसेच शासनाचे लेखी निवेदनाद्वारे लक्ष वेधले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) काचेची आच्छादने असलेल्या इमारतीकरीता अग्नि सुरक्षा उपाययोजनांची नियमावली महानगरपालिकेकडून तयार करण्यात आली असून त्याची अंमलबाजावणी केली जात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माथेरान (जि.रायगड) येथील दस्तुरी ते पांडे प्ले ग्राऊंड या साडेपाच किलोमीटरच्या रस्त्यावर मातीचे (क्ले) ब्लॉक बसविण्यास पर्यावरण संस्थाकडून विरोध होत असल्याबाबत**

**(१९) १०९९०५ (२०-१०-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (जि.रायगड) येथील दस्तुरी ते पांडे प्ले ग्राऊंड या साडेपाच किलोमीटरच्या रस्त्यावर मातीचे (क्ले) ब्लॉक बसविणे याकरिता पर्यावरण संस्थाकडून विरोध होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदरचे काम तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) माथेरान नगरपरिषद हद्दीतील (इको सेन्सीटीव्ह झोन) मध्ये सर्व विकास कामे पर्यावरण व वन मंत्रालय यांच्या दिनांक ४ फेब्रुवारी, २००३ च्या अधिसूचनेन्वये गठीत सनियंत्रण समितीतर्फे सन २०१३ मध्ये या कामास तत्वत: मान्यता दिली आहे. तदनंतर माथेरान सनियंत्रण समिती बरखास्त झाली. सन २०१७ मध्ये माथेरान सनिंत्रण समिती पुनश्च नव्याने स्थापन झाली व त्या समितीने हरीत लवाद (एनजीटी) न्यायाधिकरणात प्राधिकरणाने शपथपत्र दाखल करण्याच्या अटीवर सदरच्या कामास अंतिम मान्यता दिली. त्याअनुषंगाने प्राधिकरणाने दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजी राष्ट्रिय हरीत लवाद (एनजीटी) कडे शपथपत्र दाखल केल्यानंतर माथेरान सनियंत्रण समितीने दिनांक ७ एप्रिल, २०१८ च्या बैठकीमध्ये काम सुरु करण्यास प्राधिकरणास आदेश दिले. तत्पुर्वी या कामाची प्राधिकरणतर्फे

दोन वेळेस निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि, कमी प्रतिसादामुळे व वैधानिक मंजूरी करणास्तव हे काम हाती घेण्यात आलेले नव्हते.

सद्य:स्थितीत दस्तुरी माथेरान (शिवाजी चौक) पर्यंत ५.६ कि.मी. लांबीच्या (क्ले) ब्लॉक रस्त्याची २०१७-२०१८ च्या दरसूचीप्रमाणे निविदा निश्चितीच्या अनुषंगाने कार्यवाही प्रगतीत आहे. प्रत्यक्षात काम पावसाळयानंतर सुरु करण्याचे नियोजन आहे.

---

**नांदेड जिल्हयात पंतप्रधान आवास योजनेतंर्गत घरकुलांच्या कामाबाबत**

**(२०) ११०१५३ (०३-०४-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात पंतप्रधान आवास योजनेतंर्गत दाखल झालेल्या प्रस्तांवापैकी गत वर्षी ११ हजार ७४७ प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूर प्रस्तावांपैकी ३६१ घरकुलांचेच काम पूर्ण झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नांदेड जिल्हयात सन २०१६-१७ मध्ये ११ हजार ५०७ घरकूल बांधण्याचे उद्दीष्ट प्रशासनाच्या वतीने देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उर्वरित घरकुलांची कामे प्रलंबित राहण्यामागची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आहे, तदनुसार शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०६-११-२०१८) :** (१) व (२) नांदेड जिल्हयातील लोहा, भोकर, किनवट, धर्माबाद व हदगाव या शहरातील घटक क्र.४ खाली ६ प्रकल्पांतर्गत एकूण २५५४ घरकुलांच्या प्रस्तावास केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीची मान्यता प्राप्त झालेली आहे.

(३) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत नांदेड जिल्हयासाठी ३४,८७९ घरकुले बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुण्यातील मुठा नदीच्या विकासाच्या धर्तीवर कल्याण येथील वालधुनीचा विकास करण्याचा प्रस्ताव**

**(२१) ११०१६८ (१२-०४-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील मुठा नदीच्या विकासाच्या धर्तीवर कल्याण येथील वालधुनीचा विकास करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता केंद्र शासनाकडून निधीची मागणी करण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१८) :** (१) अशा प्रकारचा प्रस्ताव नगर विकास विभाग, एम.एम.आर.डी.ए. अथवा पर्यावरण विभागाच्या विचाराधीन नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील पंतप्रधान आवास योजनेबाबत**

**(२२) ११०८३८ (१८-०४-२०१८). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत उस्मानाबाद जिल्हयातील उस्मानाबाद, तुळजापुर व उमरगा या तीन नगरपालिकांचा समावेश करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागातील हजारो गरिब कुटुंबांनी पक्के घर मिळेल या अपेक्षेने अर्ज दाखल केलेले होते परंतु यापैकी कोणत्याही लाभार्थ्यांना अदयापपर्यंत घर मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) उस्मानाबाद जिल्हयातील पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरासाठी अर्ज केलेल्या नागरिकांना व लाभार्थ्यांना पक्की घरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०६-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये आजमितीस ३८३ शहरांचा समावेश असून, त्यामध्ये उस्मानाबाद, तुळजापूर व उमरगा या नगर परिषदेचा समावेश आहे.

(२) व (३) उस्मानाबाद व तुळजापूर नगर परिषदेकडे अनुक्रमे ६३८२ व २९१५ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यानुसार उस्मानाबाद नगर परिषदेने दि.२१.५.२०१७ रोजी एकूण ८३१ लाभार्थ्यांचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केला होता. त्यामध्ये त्रुटी आढळून आल्याने परत पाठविण्यात आला आहे. उस्मानाबाद नगर परिषदेचा सुधारीत प्रकल्प अहवाल तसेच तुळजापूर नगरपरिषदेचा प्रकल्प अहवाल अद्यापही अप्राप्त आहे.

तर उमरगा नगरपरिषदेचा BLC घटकांतर्गतचा ९६५ घरकुलांचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्राप्त झाला असून, राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीच्या मान्यतेने सदरचा प्रस्ताव केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने (एसआरए) पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीचा कार्यक्रम हाती घेतला असल्याबाबत**

**(२३) ११३७३८ (१२-०४-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने (एसआरए) पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीचा कार्यक्रम हाती घेतला असून झोपडपट्ट्यांचे हायटेक तंत्रज्ञानाद्वारे बायोमेट्रिक सर्व्हेक्षणाचे काम सुरू होणार असल्याची बाब दिनांक २४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील एसआरए प्रकल्पांसाठी लि-डार या कंपनीच्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला होता याच धर्तीवर पुण्यातील झोपडपट्ट्यांचे बायोमेट्रिक सर्व्हेक्षण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनस्तरावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०३-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत पुणे शहरातील झोपडपट्टयांच्या सर्व्हेक्षणासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रक्रिया राबवून नवनिर्माण महिला बहुउद्देशीय संस्था यांची नेमणूक करण्यात आली आहे

सदर संस्थेला दि.१४.१२.२०१७ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) प्राधिकरण स्तरावर कार्यवाही सुरू असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील १४२ शहरात सर्वांसाठी घरे ही योजना नियोजित वेळेत पूर्ण करण्याबाबत**

**(२४) ११४१०६ (०३-०४-२०१८). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक ९ डिसेंबर, २०१५ पासून राज्यातील १४२ शहरात सर्वांसाठी घरे ही योजना कार्यान्वित केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाच्या तीन प्रकल्पातून विकासकांनी माघार घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना नियोजित वेळेमध्ये पूर्ण करण्यासाठी शासनातर्फे कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (३०-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत “सर्वांसाठी घरे” ही योजना राबविण्यात येत नाही. परंतु शासनाच्या आदेशान्वये सन २००८ पासून मुं.म.प्र.वि.प्राधिकरणामार्फत भाडेतत्वावरील घरे ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत प्राधिकरणाने मंजुरी दिलेल्या प्रकल्पांपैकी राजलक्ष्मी डेव्हलपर्स, गामा रियालिटी व एकदंत हौसिंग या तीन प्रकल्पाच्या विकासकांनी सन २०१५ नंतर भाडेतत्वावरील घरे योजनेंतर्गत स्वत: माघार घेतली आहे.

(३) प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी म्हाडाला अभियान संचालनालय व सुकाणू अभिकरण म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे. तसेच नगरपालिका आणि नगरपंचायतींशी संबंधित मुद्यांबाबत नगरविकास विभागाच्या अधिपत्याखालील नगरपालिका प्रशासन संचालनालयास (DMA) सुकाणू अभिकरण म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे. तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनामार्फत पुढील उपाययोजना करण्यात येत आहेत:-

१) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांसाठीच्या मंजूर गृहनिर्माण प्रकल्पांसाठी आवश्यक असलेली आणि निर्बाध्यरित्या वाटपासाठी उपलब्ध असलेली शासकीय जमीन संबंधित जिल्हाधिका-यांकडून रु.१/- प्रती चौ.मी. या नाममात्र दराने संबंधित अंमलबजावणी यंत्रणेस प्रदान/हस्तांतरीत करण्यात येत आहे.

२) आर्थिकदृष्टया दुर्बल घटक तसेच अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांसाठीच्या गृहप्रकल्पांना मोजणी शुल्कामध्ये ५०% सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे,

३) योजनेअंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटक तसेच अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांच्या सदनिकेच्या केवळ पहिल्या दस्ताला मुद्रांक शुल्कातून सवलत देण्यात आली असून त्यासाठी रु.१०००/-इतके मुद्रांक शुल्क निश्चित करण्यात आले आहे,

४) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणीकृत कामगारांकरीता “महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना” सुरु करण्यात आली असून त्यानुसार पात्र कामगारांना केंद्र व राज्य सरकारकडून मिळणा-या अनुदाना व्यतिरिक्त अधिक सवलती देण्यात येत आहेत.

५) योजनेअंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटक तसेच अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांसाठीच्या गृहप्रकल्पांना विकास शुल्कातून सूट देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे,

६) सार्वजनिक-खाजगी भागीदारी(PPP) तत्वावरील प्रकल्पांना रहिवाशी क्षेत्रात२.५ चटई क्षेत्रफळ निर्देशांक (FSI) अनुज्ञेय करण्यात आलेला असून हरीत /ना-विकास क्षेत्रातही १.० इतका चटई क्षेत्रफळ निर्देशांक (FSI) अनुज्ञेय करण्यात आलेला आहे इ.

७) प्रधानमंत्री आवास योजनेस आणखी व्यापकता व गती येण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) धोरणास पूरक असे, खाजगी जमीन मालक व म्हाडा यांच्यातील संयुक्त भागीदारीच्या (Joint Venture) माध्यमातून घरकुलांची निर्मिती करण्यास राज्य मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील अनुकंपाधारक उमेदवारांसाठी निर्बंध शिथील करणेबाबत**

**(२५) ११५३२३ (०४-०४-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन निर्णय क्रमाक पदनि-२०१२/प्र क्र१५/१२/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २२ मार्च २०१२ नुसार ३१ डिसेंबर २०११ पर्यंतच्या अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या प्रतिक्षेत असलेल्या उमेदवारांसाठी शासन निर्णय दिनांक २२ मार्च, २००० पासून निर्बंध शिथील करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गट क व गट ड सवंर्गातील अनुकंप तत्वावर नोकरी मिळण्यासाठी दिनांक ३१ डिसेंबर, २०११ नंतरचे उमेदवार प्रतिक्षा यादीत असुन नगर परिषद,चिखली जिल्हा बुलढाणा येथील उमेदवारांनी वेळोवेळी नगर विकास विभाग यांच्याकडे नोकरी मिळण्यासाठी अर्ज केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार प्रतिक्षा यादीत असलेल्या अनुकंपधारक उमेदवारांसाठी निर्बंध शिथील करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०१८) :** (१) शासनाने दिनांक २९/११/२०१० च्या शासन निर्णयान्वये दिनांक २२/८/२००५ नंतरच्या अनुकंपा यादीतील उमेदवारांवरील भरती निर्बंध कायम ठेवले होते. त्यानंतर शासनाने दिनांक २२/३/२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक ३१/१२/२०११ पर्यंतच्या अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या प्रतिक्षायादीत असलेल्या उमेदवारांसाठी सदर निर्बंध दिनांक २२/३/२०१२ पासून शिथिल केले, हे खरे आहे.

(२) चिखली (जि.बुलडाणा) नगरपरिषदेत दिनांक ३१ डिसेंबर, २०११ पूर्वीच्या प्रतिक्षासूचीतील सर्व अनुकंपाधारक उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. दिनांक ३१ डिसेंबर, २०११ नंतर ४ अनुकंपाधारकांचे अर्ज प्राप्त झाले आहेत.

(३) • शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक ३० जून, २०११ अन्वये दिनांक ५ जून, २०१२ पासून गट "क" आणि "ड" वर्ग संवर्गातील पद भरतीस निर्बंध उठविले आहेत.

• सद्य:स्थितीत अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या प्रतिक्षायादीत असलेल्या उमेदवारांसाठी वित्त विभागाकडून कोणतेही विशेष निर्बंध घालण्यात आलेले नाहीत.

• दिनांक ३१ डिसेंबर, २०११ नंतरच्या ४ अनुकंपाधारकांना रिक्त पदाअभावी नियुक्ती देणे शक्य झालेले नाही. रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार त्यांना नियुक्त्या देण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

___________

## नवी मुंबईत सिडको निर्मित कंडोमिनिय अंतर्गतची विकासकामे करण्यास परवानगी मिळणेबाबत

**(२६) ११६५८५ (२६-०७-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईत सिडको निर्मित कंडोमिनिय अंतर्गतची गटारे, नाले, मलनिःसारण, रस्ते, इत्यांदी कामे करण्यास शासनाने महानगरपालिकेस बंदी घातली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंडोमिनियअंतर्गत सदरची कामे झाली नसल्याने त्या परिसरात दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून वारंवार मलेरिया, डेंगू इत्यादी आजाराने नागरिक त्रस्त झाले आहेत याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदरची कामे करण्यास महानगरपालिकेस घातलेली बंदी उठवावी म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री महोदयांना व सचिव, नगरविकास विभाग यांना माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने बंदी उठविण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला अशी वस्तुस्थिती नसल्याचे नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) • दि. २६.०२.२००१ च्या शासन परिपत्रकातील तरतूदी विचारात घेता, महानगरपालिका नगरसेवक स्वेच्छा निधीतून घ्यावयाच्या कामासंदर्भात मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात आलेली आहेत.

• कंडोमिनियम सारख्या खाजगी संस्थांची/सहकारी संस्थांची/वैयक्तिक लाभधारकांची कामे नगरसेवकांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्वात बसत नाहीत.

• कंडोमिनियमाच्या खाजगी जागेत मलनि:सारण वाहिन्या व जलवाहिन्या बदलणे, पदपथ व गटारे दुरूस्त करणे, त्यांची पुनर्बांधणी करणे तसेच पथदिवे बदलणे इ. विकास कामे महानगरपालिका निधीतून केल्यास सार्वजनिक निधीचा गैरवापर केल्याचा आक्षेप लेखा परिक्षणाअंतर्गत येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

• त्याअनुषंगाने दि. २९.०५.२०१५ रोजीच्या शासन पत्रान्वये नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कंडोमिनियम अंतर्गत कामास शासन मान्यता देणे उचित होणार नसल्याचे आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना कळविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील एस.बी.रोड भागात आयसीसी ट्रेड टॉवर इमारतीच्या मोकळ्या जागेत (रिफ्यूज एरिया) अनधिकृत बांधकाम केले असल्याबाबत**

**(२७) ११६६१२ (२६-०७-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील एस.बी.रोड भागात बांधकाम व्यावसायिकाने उभारलेल्या आयसीसी ट्रेड टॉवर इमारतीच्या मोकळ्या जागेत (रिफ्यूज एरिया) अनधिकृत बांधकाम केले असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या ठिकाणी शोभेच्या काचा लावण्यात आल्या असून या अनधिकृत बांधकामाला महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी अभय दिले असल्यामुळे भविष्यात आयसीसी ट्रेड टॉवर इमारतीमध्ये आग लागली तर ती विझवणार कशी व तेथील बंदिस्तांना बाहेर काढणार कसे असा प्रश्न उपस्थित झाला असून इमारतीमधील रिफ्युज एरियामध्ये अशा प्रकारे बेकायदा बांधकाम होत असतांना संबंधित विभागाचे अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले आणि त्यानुसार शासनाने संबधितांवर व त्यांना पाठिशी घालणा-या प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०१८) :** (१) अशी बाब नाही.

(२) रिफ्युज एरिया बंदीस्त करण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील मेट्रो रेल्वेसाठी एमएमआरडीएने कोणतीही परवानगी न घेता रस्त्याचे खोदकाम सुरु केल्याबाबत**

**(२८) ११७४०३ (२३-०७-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मेट्रो रेल्वेसाठी कोणतीही परवानगी न घेता एमएमआरडीएने रस्त्याचे खोदकाम सुरु केल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने मेट्रो बांधकामासाठी रस्ते खोदण्याचे आदेश तुम्हाला कोणी दिले व परवानगी कशाच्या आधारावर दिली गेली याची माहिती एमएमआरडीए व मेट्रो प्रशासनाने मुंबई उच्च न्यायालयाला सादर करावी असे आदेश दिनांक ०२ मे, २०१८ रोजी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ते खोदण्यापूर्वी मुंबई महानगरपालिका, पोलीस आणि शासनालाही याची पूर्व कल्पना एमएमआरडीएने तथा मेट्रो प्रशासनाने दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्ते खोदाईमुळे पादचारी व वाहनांची होणारी कोंडी लक्षात घेऊन कोणती पर्यायी उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) मुंबई मेट्रो मार्गाच्या बांधकामासाठी रस्त्यावर ९ मीटर रूंदीच्या पट्टयात दोन्ही बाजूने बॅरीकेड लावण्यात आले असून बॅरीकेडच्या आतच खोदकाम करण्यात येत आहे. वाहतूकीची गैरसोय होऊ नये यासाठी संपूर्ण मार्गावर बॅरीकेड न लावता, टप्प्याटप्प्याने बॅरीकेड लाऊन मेट्रो मार्गाचे बांधकाम करण्यात येत आहे. मेट्रोच्या बांधकामामुळे वाहतुकीची गैरसोय कमी होण्याच्या दृष्टीने वाहतूक पोलिसांशी समन्वय साधून कामाचे नियोजन करण्यात येत आहे. तसेच ट्रॅफिक डार्व्हजनसाठी अनेक उपाययोजना केल्या आहेत. त्यासाठी आवश्यक तेथे ट्रॅफिक वार्डन नेमणे, सुचना फलक लावणे आदि उपायोजना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने बांधलेल्या इमारतीमध्ये प्रकल्प बाधितांसाठी राखीव असलेल्या सदनिकांबाबत

**(२९) ११७४२२ (२३-०७-२०१८). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने बांधलेल्या इमारतीमध्ये पात्र झोपडपट्टीधारकांव्यतिरिक्त विकासकाने प्राधिकरणास दिलेल्या प्रकल्प बाधितांसाठी राखीव असलेल्या सदनिका या शासनाच्या कोण-कोणत्या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या व्यक्तिंना देण्यात आल्या आहेत,
(२) असल्यास, प्रकल्पबाधितांना सदनिका देण्याबाबतचे निकष काय आहेत व किती पीएपीच्या सदनिका शिल्लक आहेत,
(३) असल्यास, पीएपी अंतर्गत शिल्लक असलेल्या सदनिका पात्र प्रकल्प बाधितांना देण्याची किती प्रकरणे निर्णयासाठी प्रलंबित आहेत व त्यानुषंगांने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री. प्रकाश महेता (१७-११-२०१८) :** (१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे पुनर्वसन योजनांमधून प्राप्त होणाऱ्या जास्तीच्या पुनर्वसन सदनिका या प्रकल्पबाधीत सदनिका म्हणून आवश्यक असणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मेट्रो प्रकल्प इत्यादी संस्थांना त्यांच्या प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या झोपडीधारकांना देण्यासाठी संबंधित संस्थांच्या मागणीप्रमाणे सुपूर्द केल्या जातात.

(२) व (३) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली मधील कलम ३३ (१०) च्या परिशिष्ट-४ मधील मुद्दा क्र.३.१२ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या विविध प्रकल्पामधील तयार होणाऱ्या पी.ए.पी. सदनिकांचा वापर हा संक्रमण शिबीर, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील बाधीत व्यक्ती किंवा पदपथावरील झोपडीधारक किंवा अन्य झोपडपट्टीमधील झोपडीधारक यांच्यासाठी करण्यात येतो.

सद्य:स्थितीत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे विशिष्ट प्रकल्पासाठी चिन्हांकित नसलेल्या ३७५ पी.ए.पी. सदनिका शिल्लक आहेत.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजनेतील बाधित १०७ व्यक्तींचे अर्ज पी.ए.पी. सदनिकांच्या मागणीसाठी प्राप्त असून वाटपाच्या कार्यवाहीत आहेत. शासनाच्या सुधारित धोरणानुसार अंदाजे ५०,००० प्रकल्पबाधीत सदनिका झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास लागणार आहेत असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या भायखळा येथील यांत्रिकी आणि विद्युत विभागातील सहाय्यक अभियंत्यास लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्याबाबत

**(३०) ११७६६९ (२५-०७-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या भायखळा येथील यांत्रिकी आणि विद्युत विभागातील सहाय्यक अभियंता श्री.प्रमोद भोसले या अभियंत्याला वॉटर प्युरीफायरचे बिल मंजूर करण्यासाठी कंत्राटदाराकडून ५० हजाराची लाच घेताना दिनांक २० एप्रिल, २०१८
रोजी वा त्या सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडूनही अद्याप त्यांच्यावर कोणतीच कारवाई केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-११-२०१८) :** (१), (२) व (३), आरोपी लोकसेवक प्रमोद भोसले याने बील मंजूर करण्यासाठी रुपये ३ लाख लाचेची मागणी करून तडजोडी अंती ५० हजार स्विकारतांना दिनांक १९.०४.२०१८ रोजी अटक करण्यात आली. त्यांच्यावर भष्टाचार प्रतिबंध अधिनियमातील तरतुदी नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणात पुढील तपास करण्यात येत आहे.

---

**राज्यातील प्रमुख शहरांत नगररचना योजनांची (टीपी स्कीम) अंमलबजावणी करण्याबाबत**

**(३१) ११८८०६ (२३-०७-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रमुख शहरांत नगररचना योजनांच्या (टीपी स्कीम) अंमलबजावणीस होणारा विलंब टाळण्यासाठी राज्याच्या नगररचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयाकडून टीपी स्कीमसाठी नविन धोरण आखण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी संचालनालयाकडून पाच सदस्यीय विचारगट (थिंक टॅक) स्थापन करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विचार गटाने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालात कोणत्या नविन पध्दती देण्यात आल्या आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१८) :** (१) अशी बाब नाही.

तथापि अधिनियमातील तरतुदींनुसार नगर रचना योजना जलद गतीने तयार करणेसाठी उपयुक्त मार्गदर्शक सूचना तयार करण्याची बाब नगर रचना संचालनालयाच्या स्तरावर विचाराधीन आहे.

(२) नाही. तथापि, संचालनालयामध्ये सर्वच महत्त्वाच्या व धोरणात्मक बाबींवर विचार-विनिमय करण्यासाठी संचालनालयाच्या स्तरावर एक विचारगट गठीत करण्यात आला आहे.

(३) ते (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहीद जवानांसाठी शासनाने जाहीर केलेल्या २५ लाखाच्या मदतीच्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत**

**(३२) १२०४६१ (२३-०७-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी झालेल्या सशस्त्र सेना ध्वज सोहळ्यादरम्यान मा.मुख्यमंत्री महोदय यांनी शहीद जवानांसाठी शासनातर्फे २५ लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन निर्णयात दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी पासून अंमलबजावणीची तारीख टाकण्यात आली असून त्यामुळे दिनांक २३ डिसेंबर ला जम्मू कश्मिरमध्ये शहीद झालेले मेजर श्री.प्रफुल मोहरकर आणि दिनांक ३० डिसेंबर ला अरुणाचल

प्रदेशात शहीद झालेले मेजर श्री.प्रसाद महाडिक या वीरांच्या पत्नीसह एकूण आठ जवानांचे कुटुंबीय या मदतीपासून वंचित राहिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहीद जवानांसाठी जाहीर केलेल्या २५ लाखाच्या मदतीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी दिनांक २१ डिसेंबर २०१७ पासून करून वंचित आठ शहीद जवानांच्या कुटुंबियांना लाभ देणेबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२२-११-२०१८) :** (१), (२), (३), (४) महाराष्ट्र राज्याचे शहीद झालेल्या जवानांसाठी शासनामार्फत मदत देण्याबाबत शासनस्तरावर विचाराधीन होती. त्यानुसार मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेनुसार दिनांक १ जानेवारी, २०१८ पासून अंमलबजावणी करण्यात येत आहे. संरक्षण मंत्रालयाच्या प्राप्त झालेल्या अहवालानुसार अरुणाचल प्रदेशात शहीद झालेल्या मेजर दिवंगत प्रसाद महाडीक यांचा मृत्यु युध्दजन्य परिस्थिती व्यतिरिक्त अन्य कारणांमुळे झाल्यामुळे आर्थिक मदत त्यांना अनुज्ञेय होत नाही. शहीद वीर जवान श्री. प्रफुल्ल मोहरकर यांचे मदतीचे प्रकरण प्राप्त होताच त्यांना अनुज्ञेय रक्कमेची मदत देण्यात आलेली आहे.

शहीद जवानांसाठी २५ लाखाच्या मदतीच्या शासन निर्णयाची पूर्वोलक्षी प्रभावाने अंमलबजावणी करणेबाबत लोकप्रतिनिधींनी शासनास निवेदने सादर केली असून, त्यानुसार राज्यातील शहीद जवानांना आर्थिक मदतीच्या शासन निर्णयाची पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहराला उजनी जलाशयातून पाणी पुरवठा करण्यासाठी**
**दुसरी समांतर जलवाहिनी मंजूर करण्याबाबत**

**(३३) १२०४७१ (२३-०७-२०१८). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहराला उजनी जलाशयातून पाणी पुरवठा करण्यासाठी दुसरी समांतर जलवाहिनी मंजूर करावी म्हणून सोलापूर महानगरपालिकेने ६९२ कोटींचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने त्यास माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान मंजूर दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेसाठी शासन महानगरपालिकेला किती रक्कम अनुदान म्हणून देणार आहे,
(४) असल्यास, या समांतर जलवाहिनेचे काम केव्हा सुरु होणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) होय.

तथापि, आता रुपये ४५० कोटी किंमतीचा प्रकल्प स्मार्ट सिटी योजनेतून राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यापैकी रुपये २०० कोटी निधी स्मार्ट सिटी अभियानातून व उर्वरित रुपये २५० कोटी इतका निधी NTPC द्वारे उपलब्ध होणार आहे.

---

## उरणमध्ये जेएनपीटी बंदर असतानाही प्रशासनाने सीएसआर निधीतून प्राप्त झालेला निधी अन्यत्र खर्च केल्याबाबत

**(३४) १२०४७७ (२३-०७-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथील जेएनपीटी बंदरासाठी उरण तालुक्यातील दोन गावे विस्थापित झाली असून, इतर १८ प्रकल्पग्रस्त गावात जेएनपीटी प्रशासनाने कोणत्याही प्रकारच्या मुलभूत सोयीसूविधा पुरविलेल्या नाहीत, तसेच सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये सीएसआर निधीतून प्राप्त झालेल्या २१ कोटी रूपयांचा निधी उरण तालुका वगळून राज्यातील नागपूर, अमरावती, नंदूरबार आदी १७ जिल्हयांसाठी दिला असल्याने उरण या प्रकल्पग्रस्त तालुक्यांवर एक प्रकारे अन्यायच झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जेएनपीटी बंदरामुळे उरण तालुक्यात अनेक समस्या निर्माण झालेल्या असून, जेएनपीटीला सीएसआर निधीतून प्राप्त झालेल्या २१ कोटी रूपयांमधून उरण तालुक्याच्या विकासासाठी एकही पैसा खर्च न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, जेएनपीटी प्रकल्पग्रस्त गावांसाठी सदरहू निधी न वापरता इतरत्र वापरल्यामुळे प्रकल्पग्रस्तांवर झालेल्या अन्यायाविरोधात दिनांक १७ मे २०१८ रोजी वा त्या सुमारास उरणमधील करळफाटा येथे प्रकल्पग्रस्तांनी धरणे आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उरणमधील स्थानिक भूमीपूत्र व प्रकल्पग्रस्तांवरील अन्याय दूर करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१८) :** (१) व (२) होय.

जे.एन.पी.टी. ही संस्था केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली कार्यरत असून सदर सी.एस.आर.फंडाचा विनियोग मिनिस्ट्री ऑफ शिपींगच्या मान्यतेने केला जातो. सी.एस.आर.फंडाचा विनियोग हा महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील जिल्हयांच्या जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत केला जातो. आतापर्यन्त जे.एन.पी.टी.ने नंदुरबार, सोलापूर, उस्मानाबाद, वाशिम, जालना, यवतमाळ, औरंगाबाद, पुणे, लातूर, वर्धा, अमरावती, जळगाव इत्यादी जिल्हयांना सी.एस.आर.फंड दिला आहे. तसेच काही फंड हा औरंगाबाद व नागपूर जिल्हयातील आरोग्यसेवांच्या विकासासाठी दिला आहे. सध्या सि.एस.आर. फंडामधून उरण तालुक्यातील खाजगी खार जमिनीवरील बंधा-याच्या नुतनीकरणासाठी तरतुद करण्यात आली आहे. तसेच

जे.एन.पी.टी.च्या सी.एस.आर.फंडामधून हनुमान कोळीवाडा येथील शाळेचे व स्मशानभूमीचे नुतनीकरण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे नवीन शेवा येथील गटाराच्या व रस्त्याच्या कामाची निविदा काढून सदर कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत.

याव्यतिरिक्त जे.एन.पी.टी.विश्वस्त मंडळाने दिनांक २७.०३.२०१८ च्या बैठकीमध्ये सी.एस.आर. फंडाच्या संदर्भात (१) हनुमान कोळीवाड्यामध्ये पाईपलाईनसाठी रुपये ४२.११ लक्ष, फुंडे गावामध्ये पाईपलाईनसाठी रुपये १८.१६ लक्ष, सोनारी सावरखार व करळ गावामध्ये अंतर्गत रस्ते दुरुस्तीसाठी ४७.५० लक्ष व पाणजे गावामध्ये २ स्वच्छतागृहासाठी २१.८० लक्ष मंजूर केले आहेत. तसेच दिनांक २६.०७.२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये हनुमान कोळीवाडा, जसखार, करळ, सोनारी, नवीन शेवा या गावांसाठी पाणी पुरवठा व स्वच्छता गृहांसाठी अनुक्रमे रुपये १४.८५ लक्ष , रुपये ११६.९९ लक्ष, रुपये १८२.९८ लक्ष, रुपये ५०.८५ लक्ष व रुपये ७५.५२ लक्ष मंजूर केलेले आहेत.

हनुमान कोळीवाडा, जसखार, करळ, सोनारी व नवीन शेवा या प्रकल्पग्रस्त गावांच्या विकासासाठी सिडकोच्या मदतीने विकास आराखडा मंजूर केला आहे.

(३) होय.

(४) जे.एन.पी.टी. मार्फत केल्या जाणा-या PPP प्रकल्पांतर्गत Concession Agreement मध्ये प्रकल्पग्रस्त व्यक्तींना प्राधान्य देण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील सातपुर-अंबड औदयोगिक वसाहतीमध्ये नविन अग्निशमन केंद्र उभारण्याबाबत**

**(३५) १२०६६३ (२३-०७-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सातपुर-अंबड औदयोगिक वसाहतीमध्ये नविन अग्नीशमन केंद्र उभारण्यात यावे अशा प्रकारची मागणी स्थानिक लोकप्रितिनिधी यांनी दिनांक २ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांचेकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने अग्नीशमन केंद्र मंजुर होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१८) :** (१) होय.

(२) सातपूर येथील औद्यागिक वसाहतीमधील अग्नीशमन केंद्र नाशिक महानगरपालिकेमार्फत चालविण्यात येत आहे. तसेच अंबड औद्योगिक वसाहतीमधील अग्नीशमन केंद्राचे बांधकाम पुर्ण झाले असून, सदर अग्नीशमन केंद्र यासाठीची भरती प्रक्रिया पूर्ण करून, कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मेहकर (जि.बुलढाणा) नगरपालिकेला कायमस्वरुपी मुख्याधिकारी नसल्याबाबत**

**(३६) १२०६९१ (२९-०७-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) नगरपालिकेला कायमस्वरुपी मुख्याधिकारी नसल्याने विविध विकास कामे ठप्प झाल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नगरपालिकेला कायमस्वरुपी मुख्याधिकारी नसण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या नगरपालिकेला कायमस्वरुपी मुख्याधिकारी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०१८) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) व (३) मुख्याधिकारी, नगरपरिषद मेहकर या पदावर श्री. सुहास जगताप यांची दिनांक १२/६/२०१८ च्या शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली आहे. तथापि, सदर आदेशाविरुद्ध श्री. जगताप यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे मुळ अर्ज क्रमांक ४०२/२०१८ दाखल केला आहे. सदर प्रकरणी अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

सध्या मेहकर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार मुख्याधिकारी, चिखली नगरपरिषद यांच्याकडे आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंगळवेढा (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) नगरपरिषद येथे सुमारे २५ अधिकाऱ्यांची विविध पदे रिक्त असल्याबाबत**

**(३७) १२१०५१ (२६-०७-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) नगरपरिषद येथे सुमारे २५ अधिकाऱ्यांची विविध पदे रिक्त असल्यामुळे नागरिकांना योग्य त्या सोई सुविधा मिळत नसल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रिक्त पदे भरणेबाबत मंगळवेढा नगरपरिषद प्रशासन यांनी शासनाकडे अनेकदा विनंती केल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंगळवेढा नगरपरिषदेतील २५ रिक्त पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०१८) :** (१) • नगरपरिषद मंगळवेढा यांच्या आकृतीबंधानुसार राज्य संवर्गातील १३ व राज्य संवर्ग बाह्य १६ अशी एकूण २९ पदे सद्य:स्थितीत रिक्त आहेत.

(२) व (३) • नगर विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ७ मार्च, २०१७ अन्वये अग्निशमन संवर्ग वगळता उर्वरित राज्यसंवर्गातील पदे भरण्याकरीता मान्यता देण्यात आली आहे.

• त्यानुसार सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी १८८९ पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून दिनांक १८ ते २३ मे, २०१८ च्या दरम्यान पूर्व परिक्षा घेण्यात आली आहे. सदर पदभरतीची कार्यवाही लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे.

• पदभरतीअंती नगरपरिषदांमध्ये राज्यसंवर्गीय पदांवर कर्मचाऱ्यांना नियुक्ती देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. तसेच मंगळवेढा नगर परिषदेअंतर्गत संवर्गातील मंजूर रिक्त पदे आवश्यकतेनुसार भरण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कूही (जि.नागपूर) नगरपंचायतीचे मुख्याधिकारी हे मुख्यालयी उपस्थित राहत नसल्याबाबत**

**(३८) १२२१३५ (२९-०७-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कूही (जि.नागपूर) नगरपंचायतीचे मुख्याधिकारी हे मुख्यालयात राहत नसून नगरपंचायतीला नियमित सेवा देत नसल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित अधिकारी हे मुख्यालयात न राहता शासनाच्या सोयी सुविधा व घरभाडे यांचा फायदा घेत असून शासनाची फसवणूक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबंधित मुख्याधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) :** (१), (२) व (३) • सदर विषयी “आपले सरकार” या पोर्टलवर उमाजी पुनवटकर यांनी दिनांक २१ मार्च, २०१८ व दिनांक ५ एप्रिल, २०१८ रोजी तक्रार केली होती.

• मुख्याधिकारी, नगरपंचायत कुही, जि.नागपूर हे दिनांक १६ ऑगस्ट, २०१६ पासून कार्यरत आहेत व ते सुरुवातीचे काही महिने श्री. दिनेश लांजेवार, वॉर्ड क्र.७ कुही यांचेकडे भाडेतत्वावर व नंतर वॉर्ड क्र.९ येथील श्री. कांबळे यांचेकडे भाडेतत्वावर राहत असल्याचे दिसून येते.

• दिनांक १ सप्टेंबर, २०१७ पासून ते आजपर्यंत कुही येथील स्थानिक रहिवासी श्री. मोतीराम आत्माराम ठवकर यांचे घरी भाडेतत्वावर राहत आहेत. तसेच श्री. ठवकर यांचेसोबत दिनांक ३१/८/२०१७ रोजी लिव्ह लायसन्स करारनामा केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंदेवाही व सावली (जि.चंद्रपूर) शहरातील ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांना नगरपंचायतीच्या आस्थापनेत सामावून घेण्याबाबत

**(३९) १२२८३१ (२५-०७-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदेवाही व सावली (जि.चंद्रपूर) शहरातील ग्रामपंचायत बरखास्त करून त्या ठिकाणी नगरपंचायतीची स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंदेवाही व सावली ग्रामपंचायतीमध्ये काम करणाऱ्या तत्कालीन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना अद्यापही नगरपंचायतीच्या आस्थापनांवर घेण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंदेवाही व सावली ग्रामपंचायतीमध्ये काम करणाऱ्या तत्कालीन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नगरपंचायतीच्या आस्थापनावर घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) • सावली नगरपंचायतीच्या आस्थापनेवर ग्रामपंचायतीमधील एका कर्मचाऱ्याचे समावेश करण्यात आले आहे.

• उर्वरित कर्मचाऱ्यांच्या समायोजनाचे प्रस्ताव विभागीय आयुक्त, नागपूर यांना मान्यतेस्तव सादर करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंदी रेल्वे (ता.सेलू, जि.वर्धा) येथील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत

**(४०) १२२८६५ (२९-०७-२०१८). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदी रेल्वे (ता.सेलू, जि.वर्धा) येथील श्री.सुधाकर विठोबाजी वाघमारे यांनी घराची/दुकानाचे अतिक्रमण काढण्याबाबत नगर परिषद, सिंदी रेल्वेने सन २०१७ व २०१८ मध्ये वा त्या दरम्यान नोटीस बजावली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अतिक्रमणाबाबत श्री.वाघमारे हे जिल्हा सत्र न्यायालय, वर्धा येथील अपील क्र.आसीए-०२९२/१२ नुसार नगर परिषदेविरुध्द अतिक्रमणाबाबत असलेला दावा हरलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्याधिकारी, नगर परिषद, सिंदी रेल्वे यांना दिनांक २ मे, २०१८ रोजी निवेदन दिले असून उक्त निवेदनाच्या अनुषंगाने मुख्याधिकारी यांनी कुठलीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक २ मार्च, २००९ च्या नगर विकास विभागाच्या शासन निर्णयानुसार मुख्याधिकारी, नगर परिषद, सिंदी रेल्वे यांच्याविरुध्द कार्यवाही करण्याबाबतचा निवेदन दिनांक १४ मे, २०१८ ला आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांच्याकडे लोकप्रतिनीधींनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त अतिक्रमण निष्कासित करुन मुख्याधिकारी, नगर परिषद, सिंदी रेल्वे यांचेवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१८) :** (१) होय.

(२) याबाबत मा.जिल्हा सत्र न्यायालय, वर्धा यांनी दिनांक ३ मे, २०१२ रोजीच्या निर्णयान्वये अर्जदार यांचा दावा फेटाळला आहे.

(३) दिनांक २ मे, २०१८ रोजी असे निवेदन प्राप्त नसल्याचे मुख्याधिकारी यांनी कळविले आहे.

(४) होय.

(५) • या प्रकरणी नगरपरिषदेने सार्वजनिक रस्त्याच्या आड येणारा सज्जा पाडला आहे. नगरपरिषदेची ही कृती बेकायदेशीर असल्याचा श्री. सुधाकर वाघमारे यांचा दावा, मा.न्यायालयाने फेटाळला आहे. मात्र त्याचवेळी श्री. वाघमारे यांनी केलेले बांधकाम त्यांच्या मालकीच्या जागेत केल्याचे निष्कर्ष न्यायालयाने काढले आहेत.

• सज्ज्याचे अतिक्रमण काढले असल्याने मुख्याधिकारी यांच्याविरुद्ध कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर महानगरपालिका आरोगय विभागांतर्गत रुग्ण कल्याण समितीची स्थापना करण्याबाबत

**(४१) १२२८८४ (२५-०७-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिका आरोगय विभागातंर्गत कार्यरत असलेल्या अनेक शहरी किंवा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये रुग्ण कल्याण समितीची स्थापना करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे सन २०१५ ते २०१७ या तीन वर्षाच्या कालावधीतील १४ केंद्राचा ७३ लाख ५० हजार रुपयांचा निधी शासनाकडे परत गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाने रुग्णांना सुविधा देण्यासाठी सदर प्राथमिक आरोग्य केंद्राकडे तातडीने रुग्ण कल्याण समितींची स्थापना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) सन २०१५ ते २०१७ या कालावधीत कोणताही निधी प्राप्त झालेला नसल्यामुळे शासनाकडे परत जाण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान सोलापूर महानगरपालिका अंतर्गत १२ प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रस्तरावर रुग्ण कल्याण समिती स्थापन करण्यात आली असून या केंद्रांना निधी प्राप्त होण्याचा प्रस्ताव आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांना पाठविण्यात आले आहेत. उर्वरित २ केंद्रासंदर्भात रुग्ण कल्याण समिती स्थापण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरात बारा वर्षांमध्ये केवळ ४६ झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन झाल्याबाबत

**(४२) १२३३६९ (२५-०७-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी एफएसआय कमी करावयाचा आणि दुसरीकडे सदनिकांचे क्षेत्रफळ वाढविण्याचा निर्णय घ्यायचा असे दुहेरी निर्णय घेत झोपडपट्टीतील नागरिकांची फसवणूक होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे शहरात बारा वर्षामध्ये केवळ ४६ झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१९-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत ४६ योजनांचे बांधकाम पूर्ण होऊन त्यात झोपडीधारकांचे पुनर्वसन झाले आहे. तसेच सध्या सुमारे ५२ योजनांमध्ये १३००० पेक्षा जास्त सदनिकांचे बांधकाम केले जात आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन कार्याला गती मिळावी म्हणून विविध प्रशासनीक व वैधानिक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत व येत आहेत. प्राधिकरणासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिका-याची पुर्णवेळ नेमणूक करण्यात आली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या अनुषंगाने नगर विकास विभागाने दिनांक ११.०९.२०१४ रोजी नवीन नियमावली प्रसिध्द केली आहे, प्राधिकरणाच्या सुधारीत कर्मचारी आकृतीबंधास मंजूरी देण्यात

आलेली आहे, तसेच, झोपडपट्टी धारकांची पात्रता यादी बनविण्यासाठी सक्षम प्राधिकारी अधिसूचित करण्यात आले आहेत. प्राधिकरणाच्या क्षेत्रातील झोपडपट्टयांचे तंत्रज्ञानयुक्त सर्वेक्षण देखील करण्यात येत आहे. पुनर्वसन कार्यासनास गती देण्याच्या उद्देशाने शासनाने १९७१ च्या झोपडपट्टी कायद्यात काळानुरुप आवश्यक त्या दुरुस्त्या केल्या आहेत. सुधारित झोपडपट्टी अधिनियमानुसार “सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना (नियमावली)” सुधारित करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर शहरातील हुतात्म्यांच्या निवासस्थानांची व स्मारकांची झालेली दुरवस्था

**(४३) १२३६०४ (२६-०७-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरातील क्रांतीकारकाचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जगन्नाथ शिंदे, किसन सारडा, मल्लप्पा बनशेट्टी, कुर्बान हुसेन या चार हुतात्म्यांची निवासस्थान व स्मारकांची दुरवस्था झाली असून स्थानिक प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त स्मारकांच्या दुरुस्तीसाठी व विकासासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) :** (१) व (२) • चार हुतात्म्यांच्या निवासस्थानांचा ताबा त्यांचे वारसांना देण्यात आला असल्याने महानगरपालिकेकडून त्याची दुरुस्ती करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
• महानगरपालिका हद्दीत मार्कंडेय उद्यानात हुतात्मा स्मारक असून या स्मारकाची देखभाल व दुरुस्ती करणेसाठी शासनाने दिनांक २७/३/२०१७ रोजी रुपये १०,८७,६८०/- इतका निधी वितरीत केलेला असून त्यामध्ये हुतात्मा स्मारकातील नवीन फरशी बसविणे, स्लायडींग खिडकी बसविणे, टाईल्स बसविणे, पेव्हर ब्लॉक बसविणे, गिलाव करणे, रंगरंगोटी करणे, बाथरुम दुरुस्ती करणे इत्यादी कामे पूर्ण झालेली आहेत. तसेच सिलिंग करणे व विद्युतीकरण ही कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ओम सिध्दीविनायक सह.गृह संस्था ( नियो) यांनी विकासकामार्फत सादर केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या प्रस्तावाबाबत

**(४४) १२३६९६ (२३-०७-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओम सिध्दीविनायक सह.गृह संस्था (नियो) प्रभादेवी, मुंबई यांनी विकासकामार्फत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत भुसंपादन प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे रितसर कागदपत्रांसह दि ०३ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भुसंपादनाची मागणी मान्य करुन मा.गृहनिर्माण मंत्री यांनी या सहकारी गृहनिर्माण संस्थेची नस्ती माहे ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मंत्रालयात गृहनिर्माण विभागाकडे पाठविली होती, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्थेच्या विकासकाने संपूर्ण कागदपत्रे सादर केली असून मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी कांही तांत्रिक मुददा उपस्थित करुन ही नस्ती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडे अनेकवेळा पाठविली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सर्व झोपडपट्टी पुनर्वसन योजना तातडीने पुर्ण करण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतले असून ओम सिध्दीविनायक सह.गृह संस्थेच्या मंजुरी प्रकरणात मंत्रालयातील अधिकारी तसेच झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरणातील उपजिल्हाधिकारी व तहसिलदार यांनी संगनमत करुन हे प्रकरण तीन वर्षाच्या आसपास प्रलंबित ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०५-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) ओम सिध्दीविनायक सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि. व पु.), अधिनियम १९७१ च्या कलम १४ (१) अन्वये एकूण १६२३.७६ चौ.मि. भूसंपादनाचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांचेकडून शासनास प्राप्त झाला. दरम्यान, जमिन मालक कलकत्तावाला टेप वर्क्स यांच्या वतीने श्री.रमेश मखीजा यांचेकडून प्राप्त तक्रारीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडून अहवाल मागविण्यात आला. त्यानुसार, प्राधिकरणाने सदर मिळकत CRZ-II क्षेत्रात समाविष्ट असल्याचे कळविले. याबाबत Maharashtra Coastal Zone Management Authority (MCZMA) यांच्याकडून ना-हरकत प्रमाणपत्रासह अहवाल सादर करण्याबाबत शासन पत्र, दि.२७.७.२०१७, दि.१५.६.२०१८ व दि.१७.१०.२०१८ अन्वये प्रधिकरणास कळविले आहे. प्राधिकरणाकडून अहवाल अद्याप अप्राप्त आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मेळघाट (जि.अमरावती) येथील धारणी व चिखलदरा तालुक्यातील अनेक गावांमध्ये अग्निशमन वाहन नसल्याबाबत

**(४५) १२३९२९ (२६-०७-२०१८). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि.अमरावती) येथील धारणी व चिखलदरा तालुक्यामधील अनेक गावांमध्ये आगीच्या घटना सुरु असून तेथे अग्निशमन वाहन नसल्याने तालुक्यात आगीमुळे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मेळघाटातील अग्निशमन वाहनाचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याची बाब दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, मेळघाटात अग्निशमन वाहन कधीपर्यंत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१८) :** (१), (२), (३) व (४) • चिखलदरा नगरपरिषदेने अग्निशमन वाहन खरेदी करुन अग्निशमन सेवा प्रस्थापित केली आहे.
• धारणी नगरपंचायतीस अग्निशमन वाहन खरेदी व अग्निशमन केंद्र बांधणे यासाठीचा प्रस्ताव पाठविण्यास महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाने कळविले आहे. अद्याप नगरपंचायतीकडून सदर प्रस्ताव संचालनालयास प्राप्त झालेला नाही.
• सदर प्रस्ताव तात्काळ संचालनालयास पाठविण्यास नगरपंचायत, धारणी यांना कळविण्यात आले आहे.

---

**शेगांव (जि.बुलढाणा) नगरपालिका हद्दीत उपलब्ध असलेल्या गाळ्यांपैकी काही गाळे मासे विक्री करणाऱ्या व्यवसायिकांना मंजूर करणेबाबत**

**(४६) १२४५३७ (३०-०७-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेगांव (जि.बुलढाणा) नगरपालिका हद्दीत मासे विक्री करण्यासाठी गाळे उपलब्ध करुन न दिल्यामुळे व आठवडीबाजारात मासे विक्री करण्यास बंदी घातल्यामुळे मासे विक्री करणाऱ्यांना दुसरा कोणताही व्यवसाय उपलब्ध नसून त्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगरपालिकेच्या हद्दीतील विकसीत करण्यात आलेल्या भाजी मार्केट व इतर मार्केटपैकी १५ गाळे मासेमारी करणाऱ्या व्यवसायीकांसाठी आरक्षित करण्याबाबत किंवा आठवडेबाजारातील जवळच्या परिसरात मासे विक्रीसाठी ओटे बांधुन देण्याबाबत मा.लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, नगरविकास यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) :** (१) • आठवडी बाजारात मासेविक्रीसाठी बंदी घालण्यात आलेली नाही.
(२) होय.

(३) • यासंदर्भात मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५/११/२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत मासे विक्रीसाठी १५ गाळे उपलब्ध करुन देण्याचे निदेश मा.राज्यमंत्री महोदयांनी दिले होते.

• महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ नुसार मासेविक्री धारकांनी लिलावात भाग घेऊन दुकान गाळे मासिक भाडेपट्याने घेणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना लिलावात भाग घेणे आवश्यक आहे.

• शेगांव नगरपालिका, जि.बुलढाणा हद्दीत मासे विक्री करण्यासाठी गाळे उपलब्ध करुन देण्यासाठी लिलावाची प्रक्रिया दिनांक ७/५/२०१८ पासून सुरु केलेली आहे, तथापि, त्यात मासेविक्री धारकांनी सहभाग घेतलेला नाही.

• शेगांव नगरपालिका, जि.बुलढाणा हद्दीत मासे विक्री करीता एकूण ६ गाळे तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या अनुदानातून कर्ज वसुली होत असल्याबाबत**

**(४७) १२४६४३ (२३-०७-२०१८). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांच्या खात्यावर रक्कम जमा केल्यानंतर लाभार्थ्यांच्या खात्यातून कर्जाची रक्कम वसूल करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थ्याचे खात्यातून परस्पर कर्जाची वसुली केल्यास प्रधानमंत्री आवास योजना पूर्णत्वास जाऊ शकणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाभार्थ्याचे परस्पर कर्जाची रक्कम वसूल करणाऱ्या बँकेविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०६-११-२०१८) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) घटक क्र.४ (BLC) अंतर्गत परभणी जिल्ह्यातील जिंतूर येथील ७५० घरकुलांचा प्रकल्प, सेलू येथील ४९० घरकुलांचा प्रकल्प आणि परभणी येथील ५०० घरकुलांच्या प्रकल्पास केंद्रिय मान्यता व सनियंत्रण समितीने मान्यता दिलेली आहे.

त्यापैकी परभणी येथील ५०० घरकुलाच्या प्रकल्पास केंद्र शासनाच्या हिश्श्याचा पहिल्या हप्त्याचा रु.०.३९६ कोटी इतका निधी संबंधीत प्राधिकरणास वितरीत करण्यासाठी सुकाणू अभिकरण म्हणून म्हाडा, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. जिंतूर व सेलू येथील अनुक्रमे ७५० व ४९० येथील घरकुलास केंद्र शासनाकडून अद्यापही निधी प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सदर प्रकल्पातील निधी लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा झाला नसल्याने, त्यांच्या खात्यातून वसूल होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**धारणी (जि.अमरावती) शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या योजनेच्या विहिरीची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४८) १२५०३६ (३०-०७-२०१८). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारणी (जि.अमरावती) शहराच्या पाणी पुरवठा करणार्या योजनेची विहीर खचल्याने माहे जून, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान तीन दिवस शहराला पाणी पुरवठा बंद होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगर पंचायत प्रशासनाला विहीर दुरुस्तीबाबत लेखी तक्रार देवून सुद्धा विहीर दुरुस्ती केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर विहीरीची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) :** (१), (२) व (३) • या एकाच विहिरीपासून संपूर्ण शहरास पाणी पुरवठा होत नाही. कारण नगरपंचायत धारणीकडे शहरात पाणी पुरवठ्याचे एकूण १२ स्त्रोत आहेत. सदर विहिर खचल्याने फक्त या विहिरीचे पाणी उपयोगात घेण्यात आले नाही. या वॉर्डात पाणी पुरवठा करीता १ बोअर सुद्धा आहे. त्या बोअरने त्या प्रभागात पाणी पुरवठा करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

• नगरपंचायतीने सदर विहिर दुरुस्ती करण्याकरीता सर्वसाधारण सभा दिनांक २ जून, २०१८ रोजी ठराव क्रमांक १८ नुसार पारित केला आहे व सदर विहिर दुरुस्त करण्याकरीता निविदा कार्यवाही पुर्ण झाली असून दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती येथील छत्री तलाव सौदर्यीकरणाच्या कामासाठी विशेष बाब म्हणून निधी मंजूर करण्याबाबत**

**(४९) १२५३९५ (३०-०७-२०१८). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील छत्री तलाव सौदर्याीकरणाच्या कामासाठी जिल्हाधिकारी अमरावती यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ११ जून, २०१८ रोजी वा त्या सुमारास समितीची बैठक होऊन या बैठकीमध्ये मास्टर प्लान ला मान्यता देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती शहराचा महत्वपूर्ण प्रकल्प असून अमरावती शहराच्या सौंदर्यात भर पडणार म्हणून महत्वपूर्ण अशा या प्रकल्पाकरिता १०० कोटी रु. शासनाने विशेष बाब म्हणून मंजूर करण्याबाबतची मागणी मा.लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१८) :** (१) अमरावती येथील छत्री तलाव सौंदर्यीकरण या कामाच्या नकाशे व आराखडयास अमरावती जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दि.११ जून, २०१८ च्या बैठकीत मान्यता दिली असल्याचा अहवाल आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांनी सादर केला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) प्रथम टप्प्यात रु.२४.७० कोटीच्या कामास मंजूरी देऊन वित्तीय वर्ष सन २०१५-१६ मध्ये रु.१२.३५ कोटी इतक्या शासन हिश्शाची रक्कम महापालिकेस जिल्हाधिकारी अमरावती यांच्या मार्फत दि.८ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आली आहे.

---

**तारकर्ली बंदर (ता.मालवण, जि.सिंधुदुर् ) येथील जेट्टीच्या बांधकामाबाबत**

**(५०) १२६२९१ (०३-०८-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारकर्ली बंदर (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथे जेट्टीचे बांधकाम व विकासाची कामे या कामाची निविदा अंदाजपत्रकीय दराच्या २४.९० टक्के कमी दराने मंजूर करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या निविदा नियमावलीनुसार एखाद्या ठेकेदाराची जेव्हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा २० टक्के पेक्षा कमी दराने निविदा स्वीकृत होते तेव्हा एवढ्या कमी दराने त्याला काम कसे परवडेल याचा खुलासा करणे आणि संबंधित कार्यालयाकडे सुधारित अंदाजपत्रक सादर करत ते मंजूर करून घेणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामाचा ठेका घेतलेल्या मे. निर्माण इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे कोणताही खुलासा सादर केलेला नाही आणि सुधारित अंदाजपत्रक सादर करून ते मंजूर करून घेतलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वर नमूद प्रकरणी निविदा नियमावली प्रमाणे ठेकेदाराचा खुलासा घेणे व सुधारित अंदाजपत्रक बनवणे बंधनकारक असताना तशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न करणा-या महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या संबंधित अधिका-यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी अशा आशयाची तक्रार कस्तुरीमृग फाऊंडेशनच्या वतीने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि परिवहन व बंदरे विभागाच्या प्रधान सचिवांकडे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग दिनांक १२.०४.२०१७ नुसार ठेकेदाराने १०% पेक्षा कमी दराने निविदा भरलेली असल्यास अतिरिक्त सुरक्षा रक्कम स्विकारली जाते व ती रक्कम १० % पेक्षा जेवढी कमी असेल तेवढे टक्के जास्त अतिरिक्त सुरक्षा रक्कम अनामत म्हणून ठेवली जाते व ती कामे व्यवस्थितपणे पूर्ण केल्यानंतरच कंत्राटदारास परत करण्यात येते. सदर काम २४.९० % कमी दराने असल्याने अतिरिक्त सुरक्षा रक्कम जमा करण्यात आली आहे. सदरचे काम दिनांक १६.०५.२०१८ रोजी पूर्ण झाले आहे.

(४) होय.

(५) मे.निर्माण इन्फ्रास्ट्रक्चर यांनी सदर काम समाधानकारकपणे पूर्ण केले असल्यामुळे ठेकेदारांकडून खुलासा मागविणे व संबंधित अधिका-यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्धभवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.